# शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२०२६१२२२१७

ई मेल आय.डी.क्र dydpune@gmail.com वेब साईट क्रमांक www.dydepune.com


महत्वाचे

जा.क्र.उमाशि-२/११ वी ऑनलाईनप्रवेश/पुवि/२०१५

दिनांक : ७/४/२०१५ ७०९९

8 APR 2015

प्रति

प्राचार्य /मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये
पुणे व पिंपरी चिंचवड शहर परिसर, पुणे

विषय : इ. ११ वी चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत.

संदर्भ : १) या कार्यालयाचे परिपत्रक उमाशि-२/पुवि/ऑनलाईन प्रवेश १४-१५/२३९६ दिनांक ३०/३/२०१४
२) दिनांक ७/४/२०१५ रोजी ची सहविचार सभा.

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र तसेच कटक मंडळातील कनिष्ठ महाविद्यालयीन इयत्ता ११ वी चे शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील प्रवेश ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहेत.

इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशा संदर्भात विद्यार्थी पालकांसाठी प्रवेशा संबंधीची तसेच कनिष्ठ महाविद्यालया बाबतची परिपूर्ण व अचूक माहिती उपलब्ध करुन दयावयाची आहे. सदर माहतीच्या आधारे विद्यार्थी प्रवेशाबाबत मागणी नुसार व गुणवत्तेनुसार प्रवेश निश्चित होणार आहेत. याकरीता आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची सन २०१४-१५ मध्ये प्रवेश पुस्तिकेत दिलेल्या माहितीमध्ये काही बदल झाला असल्यास, त्यांची नोंद करणे तसेच सन २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये नवीन मान्यता मिळालेले कनिष्ठ महाविद्यालय, जादा अतिरिक्त शाखा, तुकडया मंजूरी व जादा वैकल्पिक विषयास मंजूरी मिळालेले कनिष्ठ महाविद्यालय इत्यादी बाबतचा समावेश व बदल दिनांक १३/४/२०१५ व १५/४/२०१५ रोजी ऑनलाईन करण्यात येणार आहे. त्यासाठी दिनांक १३/४/२०१५ व १५/४/२०१५ रोजी ज्या कनिष्ठ महाविद्यालयांची दुरुस्ती करावयाची आहे त्यांनी व ज्या कनिष्ठ महाविद्यालयांच्या माहितीत कोणताही बदल नाही त्यांनी *काही बदल नाही* (**No Change**) या आशयाचे पत्र समक्ष सादर करावे. गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स, कर्वेनगर, पुणे येथे सकाळी १०.०० ते सायं ५.०० दरम्यान दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्रासह उपस्थित राहून आवश्यक ती दुरुस्ती करुन घ्यावी. आवश्यक मान्यता पत्राशिवाय नोंद घेतली जाणार नाही.

सन २०१४-१५ मध्ये जी कनिष्ठ महाविद्यालये बंद झालेली आहेत किंवा कनिष्ठ महाविद्यालयाने एखादी शाखा, विषय अथवा माध्यम बंद केले असेल त्यांनीही वरील दिनांकास माहिती सादर करणे

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१
दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२०२६१२२२१७
ई मेल आय.डी.क dydpune@gmail.com वेब साईट क्रमांक www.dydepune.com

आवश्यक आहे. चुकीची माहिती प्रसिध्द झाल्यास त्यास संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य जबाबदार राहतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

| अ.क्रं | झोन क्रमांक | झोनचे नांव | ऑनलाईन पध्दतीने बदल / दुरुस्ती / नोंदणी करण्याचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| | १ | पुणे शहर | १३/४/२०१५ | सकाळी १०.३० ते २.०० |
| | २ | कर्वेनगर / कोथरुड | | |
| | ३ | पर्वती/स्वारगेट/धनकवडी | | |
| | ४ | सिंहगड रोड | १३/४/२०१५ | दुपारी २.३० ते ५.०० |
| | ५ | कॅम्प/ येरवडा | | |
| | ६ | हडपसर | १५/४/२०१५ | सकाळी १०.३० ते २.०० |
| | ७ | शिवाजीनगर /औंध पाषाण | | |
| | ८ | पिंपरी भोसरी | १५/४/२०१५ | दुपारी २.३० ते ५.०० |
| | ९ | चिंचवड निगडी | | |

(बाळासाहेब ओव्हाळ)
सचिव
इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समिती
तथा
सहाय्यक शिक्षण संचालक,
पुणे विभाग, पुणे